(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमधील**

**फौजदारी अपीलीय अधिकारीता**

**फौजदारी रिट याचिका क्रमांक ११६८/२०२३**

१) अनिल जयसिंघानी

राहणार - खोली क्रमांक ८०१, मायापुरी अपार्टमेंट,
ठाकूर फोटो स्टुडिओच्या मागे,
उल्हासनगर, ठाणे, मुंबई.

२) निर्मल राजकुमार जयसिंघानी

बी. के क्रमांक - ३७१, खोली क्रमांक १३, ठाकूर स्टुडिओच्या मागे,
उल्हासनगर, ठाणे, मुंबई – ४२१००५. ..... याचिकाकर्ते

विरुद्ध

१) महाराष्ट्र सरकार. मार्फत - मलबार हिल पोलीस स्टेशन

२) सरकारी अभियोक्ता

अपील शाखा,

उच्च न्यायालय, मुंबई. .... उत्तरवादी

याचिकाकर्त्याचे वकिल श्री. मनन संघाय यांच्या सूचनेवरून श्री. पार्थ सिंग, आर्य जैन, प्रियंका बोरुडे यांच्यासोबत श्री. म्रिगेंद्र सिंग, वरिष्ठ वकील.

उत्तरवादी - राज्य यांच्यातर्फे कु. गीता मुळेकर, सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यासोबत श्रीमती ए. एस. पै, सरकारी अभियोक्ता यांच्यासोबत डॉ. बिरेंद्र सराफ, महाअधिवक्ता.

**न्यायमंच - न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि**
**न्यायमूर्ती प्रकाश डी. नाईक.**

**राखून ठेवल्याचा दिनांक - ३१ मार्च, २०२३.**

**अधिघोषित केल्याचा दिनांक - ३ एप्रिल, २०२३.**

**न्यायनिर्णय (न्या. ए. एस. गडकरी द्वारे) :-**

१) याचिकाकर्ता यांनी त्यांची दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई येथे भारतीय दंड विधानाच्या कलम १२० (ब) आणि ३८५ आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाच्या कलम ८ आणि १२ अन्वये दाखल झालेल्या गुन्हा नोंद क्रमांक २८/२०२३ मध्ये त्यांना दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी रात्री ११:४५ वाजेच्या दरम्यान गोधरा, गुजरात राज्य येथून अटक केल्यानंतर २४ तासांच्या आतमध्ये मा. दंडाधिकारी यांचेसमोर हजर केले नाही आणि त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (संक्षिप्ततेसाठी फौ.प्र.सं) च्या कलम ५७ चे उल्लंघन झाले, या कारणास्तव त्यांची अटकेमधून सुटका होण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत प्रस्तुतची याचिका दाखल केली आहे.

२) याचिकाकर्त्यांतर्फे उपस्थित जेष्ठ वकील श्री म्रिगेंद्र सिंग आणि उत्तरवादी - राज्य यांचेतर्फे उपस्थित विद्वान महाअधिवक्ता डॉ. सराफ यांचे म्हणणे ऐकले. आमच्या पुढे सादर केलेल्या अभिलेखाचे अवलोकन केले.

३) जरी याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या प्रार्थना कलमांमध्ये त्यांनी अनेक दिलासे मिळण्यासाठी विनंती केलेली असली तरी, याचिकाकर्त्यांतर्फे उपस्थित विद्वान जेष्ठ वकील यांनी असे सादर केले की, ते उत्तरवादी - राज्य यांच्या ताब्यातून, याचिकाकर्त्यांची मुक्तता करण्याचा दिलासा, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ चे उल्लंघन करण्याच्या कारणास्तव, निर्बंधित करत आहे.

४) याचिकाकर्त्यांतर्फे उपस्थित विद्वान जेष्ठ वकील श्री. म्रिगेंद्र सिंग यांनी सादर केले की, याचिकाकर्ते आणि विशेषतः याचिकाकर्ता क्रमांक १ यांना दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी रात्री ११.४५ वाजेच्या दरम्यान गोधरा, गुजरात येथून अटक करण्यात आली आणि त्यांना दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी त्यांच्या अटकेनंतर म्हणजेच ३६ तासानंतर रिमांडकामी ४५ वे अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मुंबई यांचेसमोर हजर केले. पुढे असे की, दिनांक २० मार्च, २०२३ रोजीची प्रेस नोट ही डॉ. बलसिंह रजपूत यांच्या सहीनिशी निर्गमित केली होती आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातील बातमी सदर घटनेची रितसरपणे पुष्टी करते. त्यांनी पुढे असे सादर केले की, ज्या ठिकाणावरून याचिकाकर्त्यांना अटक केली होती, त्या ठिकाणची अधिकारिता असलेल्या संबंधित दंडाधिकारी यांचेसमोर हजर केले नव्हते आणि त्यांना त्यांच्या अटकेच्या ३६ तासानंतर विद्वान ४५ वे अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मुंबई यांचेसमोर हजर केले, जे भारतीय

राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ चे उल्लंघन आहे. त्यांनी असे सादर केले की, उत्तरवादी - राज्य यांनी गुजरात राज्यातील दंडाधिकारी यांचेकडून याचिकाकर्त्यांना मुंबई येथे आणण्यासाठी संक्रमण रिमांड प्राप्त केले नव्हते.मा. सर्वोच्च न्यायालयाने डी. के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (१९९७) १ एस.सी.सी ४१६ मध्ये प्रसिद्ध, या प्रकरणामधील आदेशात नमूद केलेल्या निदेशांचे पालन केले नाही.पुढे असे की, विद्वान ४५ वे अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मुंबई, यांनी सदरची बाब विचारात घेतली नाही आणि याचिकाकर्त्यांना दिनांक २७ मार्च, २०२३ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. त्यांनी सादर केले की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ चा भंग झाल्याने, याचिकाकर्ता हे उत्तरवादी - राज्य यांच्या कोठडीतून मुक्त होण्यास हकदार आहेत.

विद्वान जेष्ठ वकिलांनी कोर्टासमोर उभे राहून सहा न्यायनिर्णयांचा संच सादर केला. परंतु, त्यांनी उघडपणे असे सादर केले की, ते त्यामध्ये नमूद केलेल्या फक्त तीन प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्णयांवर भिस्त ठेवतात ती म्हणजे (i) गुणुपती केशवराम रेड्डी विरुद्ध नफीसूल हसन आणि इतर (१९५२) १ एस.सी.सी ३४३ मध्ये प्रसिद्ध; १९५२ एस सी सी ऑनलाइन एस. सी २६; (ii) मनोज विरुद्ध मध्य प्रदेश राज्य (१९९९) ३ एस सी सी ७१५ मध्ये प्रसिद्ध आणि (iii) डी.के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (१९९७) १ एस सी सी ४१६ मध्ये प्रसिद्ध.

त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, याचिकाकर्त्यांना केलेली अटक आणि त्यानंतरची त्यांना दिली गेलेली कोठडी ही बेकायदेशीर आणि भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ चे उल्लंघन म्हणून घोषित केले जावे.

५) उत्तरवादी - राज्य यांच्यातर्फे उपस्थित विद्वान महाअधिवक्ता यांनी या याचिकेमध्ये केलेल्या प्रार्थनेस विरोध केला आणि सुरुवातीलाच असे सादर केले की, याचिकाकर्ता क्रमांक १ यास विद्वान महानगर दंडाधिकारी, ६४ वे न्यायालय एस्प्लेनेड, मुंबई यांनी आझाद मैदान पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हा नोंद क्रमांक १७२/२०१६ मध्ये अपराधी म्हणून उद्घोषित केले आहे. पुढे असे की, याचिकाकर्ता क्रमांक १ यास दिनांक २० मार्च, २०२३ रोजी पहाटे २.२५ वाजेच्या दरम्यान गुजरात राज्यमधील वेजलपूर पोलीस ठाणे यांच्या अधिकारक्षेत्रामधील बेदिया नाक्याजवळ अडवल्याने त्याचा शोध लागला आणि त्यास सदर पोलीस ठाणेच्या पोलिसांच्या मदतीने स्थानबद्ध करण्यात आले. पुढे असे की, त्यानंतर ताबडतोब म्हणजेच दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दुपारी २.३० वाजेच्या दरम्यान मुंबईत आणण्यात आले आणि कायदेशीर औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर, सायंकाळी ५.०० वाजेच्या दरम्यान अटक करण्यात आली. पुढे असे की, याचिकाकर्ता क्रमांक २ आणि ज्या गाडीमधून याचिकाकर्ते प्रवास करीत होते, त्या गाडीचा वाहनचालक नामे श्री. प्रवीण एन. परमार हे त्यांच्या स्वतःच्या मर्जीने याचिकाकर्ता क्रमांक १ च्या सोबत मुंबईत आले. त्यांनी असे सादर केले की, प्रवासाचा वेळ वजा करता, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ मधील तरतुदीनुसार याचिकाकर्त्यांना २४ तासांच्या कालावधीच्या आत विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मुंबई यांचेसमोर हजर करण्यात आले. सदरबाबत आवश्यक त्या स्टेशन डायरीमध्ये नोंदी करण्यात आल्या. आरोपीच्या अटके संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले. त्यांनी सादर केले की, याचिकेमध्ये कोणतीही गुणवत्ता नसल्याने ती फेटाळण्यात यावी.

६) गुणुपती केशवराम रेड्डी विरुद्ध नफिसूल हसन आणि इतर (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीस दिनांक ११ मार्च, १९५२ रोजी अटक करण्यात आली होती आणि दिनांक १८ मार्च, १९५२ पर्यंत त्यांना दंडाधिकारी यांचे समोर हजर करण्यात आले नव्हते. परंतु, त्यास भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) च्या तरतुदींचे भंग करून कोठडीमध्ये स्थानबद्ध करण्यात आले आणि म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्काळ त्याची सुटका करण्याचे निदेशित केले. ते लक्षात घेता, याचिकाकर्त्यांनी सदर दिलेल्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवल्याने त्यांना त्याचा काहीच फायदा होणार नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाने मनोज विरुद्ध मध्यप्रदेश राज्य (उपरोल्लेखित) आणि डी.के.बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (उपरोल्लेखित) या प्रकरणांमध्ये निश्चितपणे मांडलेल्या तत्वांबद्दल दुसरे मत नाही.

७) प्रस्तुत प्रकरणामध्ये, गुन्हा क्रमांक २८/२०२३ दाखल झाल्यानंतर म्हणजेच प्रश्नांकित गुन्हा दाखल झाल्यानंतर, याचिकाकर्ता क्रमांक १ हा मिळून येत नव्हता. अभिलेख असे दर्शवते की, याचिकाकर्ता क्रमांक १ यास, आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक १७२/२०१६ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये विद्वान महानगर दंडाधिकारी ६४ वे न्यायालय, एस्प्लेनेड, मुंबई, यांनी त्यांच्या दिनांक २४ जुलै, २०१८ च्या आदेशान्वये अपराधी म्हणून उद्घोषित केले होते. पुढे असे की, तांत्रिक विश्लेषण आणि तपासानुसार, पोलिसांचे पथक हे याचे याचिकाकर्त्यांचा बारडोली, सुरत या परिसरात शोध घेण्याचा प्रयत्न करत होते. गुजरात राज्याच्या वेजलपूर पोलिसांना बेदिया नाका येथे एका कारमध्ये तीन संशयित व्यक्ती

सापडल्या आणि त्यामुळे त्यांनी मुंबई पोलिसांना त्यांची ओळख आणि पडताळणी करण्यासाठी सदर ठिकाणी बोलावून घेतले. मुंबई पोलीस पथकाने संशयितांपैकी एका संशयित व्यक्तीची ओळख याचिकाकर्ता क्रमांक १ म्हणून केली, जो बऱ्याच वर्षांपासून फरारी होता आणि प्रस्तुत गुन्ह्यामध्ये म्हणजेच गुन्हा क्रमांक २८/२०२३ मध्ये पाहिजे आरोपी सुद्धा होता. मुंबई पोलीस पथकाने दिनांक २० मार्च, २०२३ रोजी पहाटे २.२५ वाजेच्या दरम्यान वेजलपूर, गुजरात राज्य येथे याचिकाकर्ता क्रमांक १ यास स्थानबद्ध केले.आवश्यक कायदेशीर औपचारिकता जसे की स्टेशन डायरी मध्ये नोंद इत्यादी पूर्ण करण्यात आल्या आणि दिनांक २० मार्च, २०२३ रोजी सकाळी ९.२५ वाजता याचिकाकर्त्यांना सुरुवातीस तलासरी, जिल्हा पालघर येथे आणण्यात आले. याचिकाकर्ता क्रमांक १ याची वैद्यकीय तपासणी ही तलासरी ग्रामीण रुग्णालय, जिल्हा पालघर येथे करण्यात आली. याचिकाकर्ता क्रमांक २ आणि त्यांच्या कारचे वाहनचालक नामे श्री. प्रविण एन. परमार हे त्यांच्या मर्जीने याचिकाकर्ता क्रमांक १ याच्या सोबत मुंबईपर्यंत आले. दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दुपारी २.०० वाजेच्या दरम्यान पोलिसांचे पथक याचिकाकर्त्यांसह सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे पोहोचले. दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ४.५० वाजेपर्यंत वैयक्तिक झडती पंचनामा आणि इतर कायदेशीर औपचारिकता यांची पूर्तता करण्यात आली आणि सायंकाळी ५.०० वाजेच्या दरम्यान याचिकाकर्त्यांना अटक करण्यात आली. स्टेशन डायरीमध्ये आवश्यक ती नोंद करण्यात आली आहे.त्यानंतर, याचिकाकर्त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले होते, जे सदर तारखेस रात्री १०.३० वाजेच्या दरम्यान पूर्ण झाले.

८) त्यानंतर, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेच्या दरम्यान याचिकाकर्त्यांना विद्वान ४५ वे अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मुंबई यांचेसमोर सम तारखेच्या रिमांड अहवाल/ अर्ज क्रमांक ३२९/२०२३ सह सादर करण्यात आले. सदर रिमांड अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, दिनांक २० मार्च, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेच्या दरम्यान याचिकाकर्त्यांना अटक करण्यात आली होती आणि तो एक नुकताच तयार केलेला रिमांड होता. विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मुंबई यांनी सदरचा रिमांड अहवाल/ अर्ज दुपारी ३.२० वाजेच्या दरम्यान सुनावणीसाठी पटलावर घेतला आणि याचिकाकर्ता तर्फे उपस्थित विद्वान वकील आणि सहायक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर, त्यांना दिनांक २७ मार्च २०२३ पर्यंत पोलीस कोठडी सुनवण्यात आली. त्यामुळे उघडपणे हे स्पष्ट होते की, याचिकाकर्त्यांना त्यांच्या अटकेच्या २४ तासांच्या आत विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मुंबई यांचेसमोर हजार करण्यात आले होते.

९) दिनांक २० मार्च, २०२३ च्या सदर प्रेस नोटच्या संबंधित परिच्छेदाचे केवळ अवलोकनावरून असे निदर्शनास येते की, त्यामध्ये कोठेही असे नमूद केले नाही की, दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी रात्री ११.४५ वाजेच्या दरम्यान याचिकाकर्त्यांना गोधरा, गुजरात येथे अटक करण्यात आली होती. वरील वस्तुस्थितीविषयक बाबींवरून असे स्पष्ट होते की, याचिकाकर्त्यांना आणि विशेषतः याचिकाकर्ता क्रमांक १ यास दिनांक १९ मार्च, २०२० ते २० मार्च, २०२३ दरम्यानच्या पहाटेच्या सुमारास स्थानबद्ध करण्यात आले होते. अभिलेखानुसार, याचिकाकर्ता क्रमांक १ हा मिळून आला आणि त्यानुसार त्यास दिनांक २० मार्च, २०२३ रोजी

पहाटे २.२५ वाजेच्या दरम्यान वेजलपूर पोलीस ठाणे, गुजरात राज्य यांच्या अधिकारक्षेत्रातील वेजलपूर, बेदिया नाक्याजवळ स्थानबद्ध केले आणि त्यामुळे आमच्या मतानुसार, याचिकाकर्त्यांतर्फे उपस्थित विद्वान ज्येष्ठ वकील यांच्या युक्तिवादामध्ये काहीही तथ्य नाही की, दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी याचिकाकर्त्यांना अटक करण्यात आली होती. विद्वान सत्र न्यायाधिश यांनी दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी रिमांड अर्जावर पारित केलेल्या आदेशातून असे लक्षात येते की, आरोपीत व्यक्ती हे इतर प्रकरणांमध्ये देखील फरारी आरोपी असल्याने त्यांची योग्य ओळख पटविल्यानंतर दिनांक २० मार्च, २०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता त्यांना अटक करण्यात आली होती. इलेक्ट्रॉनिक माध्यमातील बातमी वगळता अभिलेखावर हे दाखवण्यासाठी काहीही नाही की, आरोपींना दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी रात्री ११.४५ वाजता अटक करण्यात आली होती. तपासी अंमलदार यांनी मांडलेली कारणे ही समाधानकारक आहेत आणि त्यामुळे अटक अवैध होती असे म्हणता येणार नाही. आम्ही, दिनांक २१ मार्च, २०२३ च्या रिमांड अहवालाचे अवलोकन केले, ज्यामध्ये असे नमूद केले आहे की, आरोपींना दिनांक २० मार्च, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता अटक करण्यात आली होती. अटक/ झडती पंचनामा तयार केला गेला आणि आरोपींना अटकेची कारणे कळविण्यात आली. आरोपींना अटक करतांना, मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्यात आले. आरोपीच्या नातेवाईकांना आणि त्यांच्या ओळखीच्या व्यक्तींना आरोपीच्या अटकेबाबत माहिती देण्यात आली.

१०) भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) मध्ये असे नमूद केले आहे की, जिला अटक केली आहे आणि हवालातीत स्थानबद्ध केले आहे, अशा प्रत्येक व्यक्तीला अटकेच्या ठिकाणापासून सर्वात जवळच्या दंडाधिकारी यांच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी आवश्यक असलेला अवधी वगळून अशा अटकेपासून २४ तासांच्या कालावधीच्या आत जवळच्या दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाईल. तर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ मध्ये अशी तरतूद आहे की, कोणताही पोलीस अधिकारी वॉरंटशिवाय अटक केलेल्या व्यक्तीला, प्रकरणाच्या समग्र परिस्थितीनुसार वाजवी असेल त्याहून अधिक काळ हवालातीत स्थानबद्ध करणार नाही व दंडाधिकाऱ्याने कलम १६७ खाली आदेश दिला नसतांना असा कालावधी, अटकेच्या स्थळापासून दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी आवश्यक असलेला अवधी वगळता, चोवीस तासांहून अधिक असणार नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे, याचिकाकर्त्यांना त्यांना अटक झाल्यापासून २४ तासांच्या आत सक्षम अधिकारतेच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आले. केवळ युक्तिवाद म्हणून विचार करता, दिनांक २० मार्च, २०२३ रोजी सकाळी २.२५ वाजेच्या दरम्यान त्यांना वेजलपूर येथे स्थानबद्ध केले आणि सदर ठिकाणाहून मुंबईस येण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रवासाचा कालावधी वगळून त्यानंतर याचिकाकर्त्यांना कायद्यानुसार निश्चित केलेल्या कालावधीत सक्षम अधिकारिता असलेल्या संबंधित न्यायालयासमोर हजर करण्यात आले. आमच्या मते, प्रस्तुत प्रकरणात उत्तरवादी - राज्य यांच्याकडून भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) आणि/ किंवा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५७ चे कोणतेही उल्लंघन झालेले नाही.

११) याचिका ही गुणवत्तेचा अवमान करणारी आहे आणि म्हणून ती फेटाळण्यात येत आहे.

(न्या. प्रकाश डी नाईक) (न्या. ए. एस. गडकरी)

**<u>अस्वीकरण</u>**

या न्याय निर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x